महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १८४ वा | दिनांक : ३०/०४/२०२५ | वार : बुधवार

## सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्न, प्रकाश आंबेडकरांनी मांडली बाजू



**छत्रपती संभाजीनगर :** परभणी येथे झालेल्या हिंसाचारानंतर पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन करत अनेकांना पोलिस कोठडीत टाकले होते. यात सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील समावेश होता. सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिस कोठडीतच मृत्यू झाला होता. या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सूर्यवंशी कुटुंबाची बाजू उचलून धरली होती. आज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात या प्रकरणावर सुनावणी झाली.

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी औरंगाबाद उच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी पत्रकारांशी संवाद साधत माहिती दिली आहे. ते म्हणाले, चौकशी अधिकारी जे सरकारने नेमले होते, त्या चौकशी अधिकारीच्या संदर्भातली चर्चा झाली. त्याने २८ आरोपी जे आहेत, त्या आरोपींना त्यांनी नोटीस पाठवली. त्यात त्यांनी काय बोलले पाहिजे याबद्दल नमूद केले होते. ते आम्ही कोर्टाला नमूद करून दाखवले की ही काही फ्री आणि फेअर एनक्वायरी नाही. त्यामुळे हा जो अधिकारी आहे या अधिकाराच्या कामकाजावर स्टे द्या, असे आम्ही कोर्टाला सांगितले.

पुढे बोलताना आंबेडकर म्हणाले, कोर्टाने आज जो निर्णय दिला आहे. त्या निर्णयात त्यांनी (चौकशी अधिकारी) यापुढे कुठलाही निर्णय घ्यायचा नाही आणि कुठलाही रिपोर्ट सादर करायचा नाही, असा आदेश देण्यात आला आहे. ८ तारखेला पुन्हा कोर्टात दोन मुद्दे असणार आहेत. एकतर एसआयटी फॉरमेशन आणि आम्ही जे सारखे म्हणत आहोत की सेक्शन १९६ याच्यामध्ये पूर्तता करण्यासाठी कोर्टाने आपला अधिकार वापरला पाहिजे, यावर तेव्हा चर्चा विचारविनिमय होईल, अशी माहिती प्रकाश आंबेडकर यांनी दिली आहे.

दरम्यान, सोमनाथ सूर्यवंशी याचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे. मागिल सुनावणीत या प्रकरणात उच्च न्यायालयाने राज्य सरकारला नोटीस बजावली होती.




डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयाचे कोषाध्यक्ष इरफान इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. हसन इनामदार, डॉ. भाग्यश्री राठोड, प्रा. श्रुतिका कुलकर्णी - व्याहाळकर, कार्यालयीन अधिक्षक नूतन तुषारसिंग राजपूत, शंतनू खांड्रे, शुभम कांबळे, आशिया शेख, श्रेया इंगळे आदी दिसत आहेत.

## पाकिस्तानी हॅकर्सनी राजस्थान सरकारची वेबसाइट हॅक केली

**जयपूर :** मंगळवारी पाकिस्तानी हॅकर्सनी राजस्थान शिक्षण विभागाची वेबसाइट हॅक केली. वेबसाइटच्या होम पेजवर 'पाकिस्तान सायबर फोर्स'. 'पुढचा हल्ला गोळ्यांनी नाही तर तंत्रज्ञानाने होईल', असे लिहिले होते. शिक्षण विभागाकडून वेबसाइट पुनर्प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर हा सायबर हल्ला झाला. हॅकर्सनी पोस्टरमध्ये आक्षेपार्ह मजकूर लिहिला होता. अलिकडेच भारताने पाकिस्तानी वेबसाइट्स आणि सोशल मीडिया हँडल्सवर बंदी घातली होती.

भारताने आज पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांचे एक्स हँडल ब्लॉक केले. पहलगाम हल्ल्यानंतर ख्वाजा आसिफ यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामध्ये त्यांनी कबूल केले की पाकिस्तान बऱ्याच काळापासून दहशतवादी संघटनांना निधी देत आहे. सोमवारी भारताने 17 पाकिस्तानी युट्यूब चॅनेलवरही बंदी घातली होती.

सोमवारी रात्री पाकिस्तानी हॅकर्सनी स्वराज्य आणि शहरी विकास विभाग (DLB) आणि जयपूर विकास प्राधिकरण (JDA) यांच्या वेबसाइट हॅक करून अशाच प्रकारची पोस्ट टाकली होती. त्याने पाकिस्तानच्या समर्थनार्थ मजकूर पोस्ट केला होता. तथापि, या दोन्ही वेबसाइट्स परत मिळवण्यात आल्या. मंगळवारी सकाळी शिक्षण विभागाची वेबसाइट हॅक झाली. आयटी विंगला सक्रिय केले. शिक्षणमंत्री मदन दिलावर म्हणाले, 'शिक्षण विभागाची आयटी शाखा सक्रिय करण्यात आली आहे. सध्या वेबसाइट तात्पुरती बंद करण्यात आली आहे. पुनर्प्राप्तीचे काम वेगाने केले जात आहे. या घटनेची माहिती विभागाने सायबर सुरक्षा एजन्सींनाही दिली आहे. या सायबर हल्ल्यामागे कोणता गट सक्रिय आहे आणि कोणत्या प्रकारची माहिती खराब झाली आहे, याचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला आहे.

त्यांनी सांगितले की, कोणताही संवेदनशील डेटा लीक झाल्याची अद्याप पुष्टी झालेली नाही, परंतु सर्व यंत्रणांची व्यापक चौकशी केली जात आहे.

हॅकर्सनी एक फोटो पोस्ट केला आहे आणि त्यावर पाकिस्तान सायबर फोर्स लिहिले आहे. यामध्ये पहलगाम हल्ल्यातील बळींचे वर्णन कलाकार म्हणून केले आहे. त्याने अशी धमकीही दिली की तू आग लावलीस, आता वितळण्यास तयार राहा. पुढचा हल्ला गोळ्यांनी नाही तर तंत्रज्ञानाने होईल.

## बापानेच आवळला आपल्या ९ वर्षांच्या मुलाचा गळा

**नाशिक :** शहरात अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. ९ वर्षांच्या मुलाची वडिलांनी गळा आवळून निर्घृण हत्या केली आहे. या घटनेने नाशिक हादरले आहे. बाप एवढ्यावरच थांबला नाही. मुलाची हत्या केल्यानंतर त्याला एका गोणीत टाकून सासरवाडीत नेऊन पलंगावर टाकले असल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेने बाप आणि मुलाच्या नात्याला काळिमा फासला गेला आहे.

आपल्याच ९ वर्षांच्या मुलाला वडिलांनी गळा आवळून मारून टाकले. त्याचे मृतदेह एका गोणीत भरून सासरवाडीमध्ये जाऊन पलंगावर टाकले, या घटनेने एकच संताप व्यक्त केला जात आहे. नाशिक पोलिस घटनेचा पुढील तपास करत आहेत. घटनेची माहिती नागरिकांनी दिल्यावर उपनगर पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक माहितीनुसार, ही हत्या कौटुंबिक वादातून झाल्याचे समजते. सुमित पुजारी (३५) असे आरोपी वडिलांचे नाव आहे. आरोपी बापाने ९ वर्षीय गणेशची हत्या केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० एप्रिल २०२५


## महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन साजरे




**माळीवाडा (शिवाजी गायकवाड) :** ग्रामपंचायत येथ दि २८ सोमवार रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन साजरा करण्यात आला हा कायदा होऊन दहा वर्ष झालेली असल्याने उत्साहात हा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी लोकसेवा कायद्याचे QR कोड व कायद्याच्या सेवेचे बॅनर लावण्यात आले व मागणी आलेल्या अर्जदारांना सेवा प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले (पंचायत) जिल्हा परिषद छत्रपती संभाजी नगर यांनी सर्वांना सेवा हक्क दिवस शपथ दिली व कायद्याचे सखोल मार्गदर्शन केले. व शासनाने सामान्य माणसाला लागणारी प्रमाणपत्र ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे प्रमाणपत्र याचे सहज उपलब्ध करून घ्यावी व अल्प फी शुल्क आकारले जाते त्याचे सर्वांनी लाभ घ्यावा असे सांगितले आहेयावेळी विस्तार अधिकारी मंगेश कुंटे, जिल्हा समन्वयक विजयकुमार सावंत, सरपंच ज्योती नंदकिशोर मुळे, उपसरपंच मनेश लक्ष्मण गाजरे, ग्रामपंचायत सदस्य धम्मपाल गायकवाड, प्रवीण बर्डे, कमलबाई आस्वार,माळीवाडा ग्रामपंचायत अधिकारी जी व्ही हारदे,दौलताबाद ग्रामपंचायत अधिकारी ए सी पटेल, पोलीस पाटील प्रमोद साठे, शालेय समिती अध्यक्ष नंदकिशोर मुळे, नामदेव धनायत, संतोष बर्डे, प्रतिष्ठित नागरिक व ग्रामपंचायत कर्मचारी गणेश आस्वार, भगवान बनसोडे, यादव शिनगारे, नंदाबाई खजिनदार उपस्थित होते.






## भांगसी माता गडावर सभागृह व सुशोभीकरणासाठी चार कोटींच्या कामाचे भूमिपूजन



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे उपस्थितीत करण्यात आलेछत्रपती संभाजी नगर येथून जवळच असलेल्या भांगशी माता गडाच्या विकास करण्यासाठी आमदार अंबादास दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून प्रादेशिक पर्यटन विकास योजने अंतर्गत गडाच्या पायथ्याशी भव्य सतरा हजार स्कोअर फूट सत्संग सभागृह व परिसरात सुशोभीकरण करण्यासाठी चार कोटी रुपयांचे कामाची मंजुरी मिळाली असून त्या कामाचे भूमिपूजन दि २७ रविवारी सकाळी अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत महामंडलेश्वर स्वामी परमानंद गिरी महाराज यांच्या हस्ते भांगशी गड पायथ्याशी करण्यात आलेयावेळी ब्रह्मानंद महाराज .कैवल्यानंद महाराज गणपत धनगे .किसनराव गवळी. एकनाथराव खोसरे ..के आर शिंदे भाऊसाहेब ढमाले.सांडू पवार, उपजिल्हा प्रमुख अरविंद धिवर, संतोष खेडके , शहरं प्रमुख हरिभाउ हिवाळे उपतालुकाप्रमुख विष्णु जाधव, शहरं प्रमुख विशाल खंडागळे, वसंत प्रधान , जिल्हा संघटक आशा दातार, शहरं प्रमुख सुकन्या भोसले, तालुका संघटक अनिता डाहारिया ,उपशहरप्रमुख दत्तात्रय वर्पे ,,उपतालुकासंघटक अनिल जाधव,विभाग अंकुश कान्हेरे, रामु सुरासे, विनोद दाभाडे , सतिश हिवाळे, संतोष चंदन, उद्योजक यशवंत चौधरी, सरपंच संध्या संदिप सदावते,उजवला तोटवाल,अनिता पेहरे,नामदेव सागडे, देविदास गवांदे, देविदास गडगुळ, कारभारी महाराज जाधव, साहेबराव जाधव,त्र्यंबक जगत्ताप, अमोल वाघमारे, सोमनाथ कान्हेरे, दिपक कान्हेरे,लक्ष्मण कान्हेरे, उपतालुकाप्रमुख श्रीकृष्ण राठोड, गणेश नवले, कृ उ बा स सदस्य महेंद्र खोतकर, पाटोदा उपसरपंच कपिंद्र पेरे, उपशहरप्रमुख काकाजी जीवरग, नामदेव सागडे, उपतालुकाप्रमुख श्रीकृष्ण राठोड, गणेश नवले, कृ उ बा स सदस्य महेंद्र खोतकर, पाटोदा उपसरपंच कपिंद्र पेरे, उपशहरप्रमुख काकाजी जीवरग, नामदेव सागडे, विभाग प्रमुख संतोष चंदन, त्रिम्बक जगताप, सतीश हिवाळे, रोहिदास चव्हाण, विनोद सोनवणे, शाखाप्रमुख नरसिंग ढगे, आबासाहेब सपाटे, नितीन कलांत्रे, लहू खराटे, संतोष चंदन, त्रिम्बक जगताप, सतीश हिवाळे, रोहिदास चव्हाण, विनोद सोनवणे, नरसिंग ढगे, आबासाहेब सपाटे, नितीन कलांत्रे, लहू खराटे,गुरुकुल चे सर्व शिक्षक ,कर्मचारी व विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती

## बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षपदी आसिफ अन्सारी तर उपाध्यक्षपदी प्राचार्य डॉ. इनामदार व वाल्मीक जाधव यांची निवड




**छत्रपती संभाजीनगर :** अखिल भारतीय नाट्य परिषदेची घटक संस्था असलेल्या बालरंगभूमी परिषदेची निवडणूक नुकतीच पार पडली यामध्ये अध्यक्ष म्हणून नाट्यकर्मी आसेफ अबिबोद्दीन शेख (अन्सारी) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, तर उपाध्यक्षपदी प्राचार्य डॉ. हसन इनामदार आणि वाल्मीक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही कार्यकारणी 2025 ते 2030 या कालावधीसाठी असेल उर्वरित कार्यकारणी पुढील प्रमाणे अध्यक्ष आसिफ अन्सारी उपाध्यक्ष (प्रशासन) - डॉ. हसन इनामदार ,उपाध्यक्ष (उपक्रम)- वाल्मीक जाधव, कोषाध्यक्ष- विनोद आघाव,कार्यवाह - गोकुळ गायकवाड, सहकार्यवाह - संतोष कुलकर्णी, अर्चना देवधर. कार्यकारणी सदस्य म्हणून लक्ष्मण अहिरे, सय्यद अल्ताफ शब्बीर, राहुल बोर्डे, रमेश सोळंके, रामेश्वर झिंजुर्डे , श्रीपाद पदे, असलम शेख, ॲड. सुशीलकुमार बनकर, सल्लागार भग्यरवी कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर तर सहनिरीक्षक म्हणून डॉक्टर संजय पाटील देवळाणकर यांनी काम पाहिले. यावेळी बालरंगभूमीचे सदस्य सतीश मस्के, जितेंद्र बोरसे, सय्यद अल्ताफ, सुधीर देऊळगावकर, विशाखा शिरवाडकर, जगन्नाथ प्रांजे दाजी, वैजिनाथ राठोड, शुभम कांबळे, शंतनू खांड्रे, नूतन तुषारसिंग राजपूत , इरफान इनामदार यांचा सह सर्व सभासद उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० एप्रिल २०२५


## अंधश्रद्धा नको, श्रद्धा हवी अध्यात्मिक सेवेवर भर दिल्यास प्रश्न सुटतात - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** श्री दिलीप स्वामी जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक 26 एप्रिल 2025 रोजी श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक सेवा व बाल संस्कार केंद्र मिटमिटा येथे श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त भेट दिली. व त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. केंद्राच्या वतीने अण्णासाहेब जाधव यांनी जिल्हाधिकारी यांचा सत्कार केला.त्यांनी उपस्थित सेवेकरी यांना यथोचित मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, कुठल्याही बाबतीत श्रद्धा हवी अंधश्रद्धा नको परंतु अध्यात्मिक सेवेत कार्य केल्यास सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन आपले प्रश्न आपोआप सूटतात. कुटुंबात सुख शांती लाभते, मुलांना चांगले संस्कार मिळतात.यावेळी त्यांनी विविध सण, उत्सव, वारी परंपरा या विज्ञानावर आधारित असल्याचे उदाहरणासह स्पष्ट केले.श्री स्वामी समर्थ केंद्रासाठी 2000 चौरस फूट जागा दान दिल्याबद्दल श्रीकृष्ण कदम ,गणेश लोखंडे व आशिष धारकर यांच्या बद्दल त्यांनी गौरवोद्गगार काढले.यावेळी "ताण तणाव मुक्ती " या विषयावर त्यांनी स्वतः लिहिलेले पुस्तक केंद्रास भेट दिलेयाप्रसंगी आदरणीय श्री दिलीपजी स्वामी साहेब जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचा श्री स्वामी समर्थ महाराज प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.पुण्यतिथी सोहळ्यामध्ये सात दिवस अखंड नाम जप , गायत्री मंत्र, महामृत्युंजय मंत्र, श्री स्वामी चरित्र, दुर्गा सप्तशती पाठ, अखंड सात दिवस प्रहर इ. विविध सेवा करण्यात आल्या श्री गणेश याग , रुद्र याग,मल्हार याग, चंडी याग इ. यज्ञ करण्यात आले. श्री गुरुचरित्र ग्रंथ पारायण साठी एकूण 88 सेवेकऱ्यांनी भाग घेतला. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताह यशस्वीतेसाठी अण्णासाहेब जाधव जिल्हा प्रतिनिधी, कृष्णा कदम, गणेश लोखंडे , सूर्यकांत क्षीरसागर ,अशोक कमोदकर, भाऊसाहेब सोनवणे, डॉ. मनोज मते, केशव सूर्यवंशी, निलेश जाधव, विश्वास चाटे , इंदर जाधव, महादेव तागड, दिलीप शिरसाठ शिक्षणाधिकारी, उत्कर्ष कदम, गवळी मामा, तेजस नवले, रंजना जाधव, प्रतीक्षा चाटे, आशा कमोदकर, शितल रावतोळे, सोनल सोनवणे व देवगिरी व्हॅली, पीस होम्स, मिटमिटा व परिसरातील बहुसंख्य सेवेकरी यांनी अथक परिश्रम घेतले.

## पडेगावचे दिपक बनकर राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित



**प्रतिनिधी (शिवाजी गायकवाड) :** पडेगाव, मुंबई- नॅशनल एज्युकेशन अँड ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट आर्गनायझेशन आणि नॅशनल एकॉनॉमिक ग्रोथ टाईम्स या राष्ट्रीय संस्थांतर्फे, , छत्रपती संभाजी नगर येथील . दिपक भाऊसाहेब बनकर यांना प्रख्यात हिन्दी व मराठी चित्रपट अभिनेत्री आसावरी जोशी यांच्या हस्ते राष्ट्रीय निर्माण रत्न पुरस्कार ' प्रदान करण्यात आला.अंधेरी, मुंबई येथील कोहीनूर कॉन्टीनेन्टल या पंचतारांकित हॉटेलमध्ये संपन्न झालेल्या या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या विविध राज्यामधील अनेक व्यक्तिंना सन्मानित करण्यात आले. ,दीपक भाऊसाहेब बनकर. यांना बांधकाम क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून पदमश्री पुरस्कार विजेता अच्युत पालव, प्रख्यात हिन्दी चित्रपट गायक व संगितकार घनशाम वासवाणी, केंद्र सरकारच्या विविध विभागांना डीजीटल प्रणालीबाबत मार्गदर्शन करणारे श्री अमित देव, असोचेम - नवी दिल्ली या संस्थेच्या उपाध्यक्षा सुजाता देव, सुप्रसिद्ध गायिका मिश्तू बर्धन (प्रति लता मंगेशकर) तसेच निलकमल प्रकाशन, हैदराबाद चे संचालक श्री सुरेश शर्मा उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाला म्हणून दिपक बनकर यांचे पडेगाव, मिटमिटा पंचक्रोशीत सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# महात्मा बसवेश्वर पतसंस्थेकडून स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंतांचा सन्मान



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था व महात्मा बसवेश्वर सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पर्धा परीक्षेतील यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सन्मान सोहळा रविवारी (ता. २७) रोजी बसव सहकार भवनच्या सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब मुरूम सिटी चे कमलाकर मोटे होते. प्रमुख अतिथी अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिता मुदकन्ना, मुरूमच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य दत्ता इंगळे, माजी नगरसेवक चंद्रशेखर मुदकन्ना, बसवेश्वर पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यशस्वी विद्यार्थी संध्या उटगे, विष्णू जाधव, राहुल देशपांडे, प्रवीण गायकवाड, तेजस्विनी मुदकन्ना, शुभम गायकवाड, वैशाली माने, वैभव सातलगे, शंकर मडोळे, निकिता जाधव आदींचा मान्यवरांच्या हस्ते फेटा, शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. लखन भोंडवे, तेजस्विनी मुदकन्ना यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. दत्ता इंगळे यांनी या परिसरातील बसवेश्वर पतसंस्था म्हणजे एक सामाजिक उपक्रमशील संस्था म्हणून नावलौकिकास पात्र ठरत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या कर्तबदारीचे व संघर्षाचे कौतुक करत त्यांना सदिच्छा दिल्या. डॉ. अनिता मुदकन्ना म्हणाल्या की, यश मिळवण्यासाठी प्रामाणिक परिश्रमाशिवाय दुसरा पर्याय नाही. स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्य, योग्य दिशा आणि मनोबल ठेवल्यास यश हमखास मिळते. अपयश आले तरी त्यातून शिकत पुढे जाणे हेच खरे शिक्षण आहे. आजचा सत्कार हा विद्यार्थ्यांसाठी नव्या प्रेरणेचा स्त्रोत ठरेल. अध्यक्षीय समारोपप्रसंगी कमलाकर मोटे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवशरण वरनाळे यांनी केले. सूत्रसंचालन मोहन जाधव तर आभार अशोक जाधव यांनी मानले. यशस्वीतेसाठी पतसंस्थेचे संचालक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शहर व परिसरातील माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० एप्रिल २०२५


# समता नायक महात्मा बसवेश्वर



भारत भूमी हे संत महात्म्यांची पुण्यभूमी आहे. या भूमीला फार मोठा सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वारसा आहे. याच भूमीत जगतज्योती महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा गौतम बुद्ध, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, हे महामानव जन्माला आले. त्यांच्या महान विचाराची आजही सर्वानाच गरज आहे. कारण या महामानवांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये जनतेच्या हितासाठी, अस्पृश्यता निवारण्यासाठी, स्त्री पुरुष समानतेसाठी, आयुष्यभर धर्मांध समाजाच्या विरोधात लढा दिला. बाराव्या शतकात मंगळवेढा राज्यात कळचूर्य वंशीय घराण्याचे राज्य होते. कळचूर्यानी इंगळेश्वर बागेवाडी विभागाच्या पूरवराधीश्वर पद बागेवाडीच्या जिल्हा विजापूर मादी राजांना बहाल केलेले होते. पूरवराधिश्वर हा पंचक्रोशीतील १२ गावाचा प्रमुख असे. मादीराज व मादालांबिका पती-पत्नीच्या जीवनात असाच एक शुभ दिवस उगवला. इ.स. ११०५ मधील वैशाख शुद्ध तृतीया, रोहिणी नक्षत्रावर अक्षय तृतीयाच्या दिवशी मादालांबिकेला पुत्ररत्न झाले. नंदीचा कृपाप्रसाद म्हणून मुलाचे नाव बसव असे ठेवण्यात आले. हाच बसव पुढे समतायुगाचा दृष्टा प्रारंभकता महात्मा बसवेश्वर म्हणून जगापुढे आला. बाल बसव चंद्रकलेप्रमाणे दिसामाशी वाढत होता. अक्कांना नागालांबिका बसवाला कडेवर घेऊन बागेवाडीत फिरून यायची. बाल बसव गोंडस, सुदृढ शरीराचा, मनाने शांत धीर-गंभीर, बुद्धीने अत्यंत तल्लख होता. बसवाला शिकविण्यासाठी मादी राजांने एक संस्कृत विद्वानाची व्यवस्था केली. पुढे बसव आठ वर्षाचा झाल्यावर त्यांच्या वडिलांनी व्रतबंध संस्कार म्हणजे मुंज करण्याचे ठरवले. यासाठी परिसरातील सर्व व ब्राह्मण पंडितांना बोलवण्याचे ठरले. गावोगावी निमंत्रणे गेले उपनयन संस्काराचा मुहूर्त निश्चित झाला. परंतु यास बाल बसवाने स्पष्ट नकार दिला. त्यांनी मादीराजांना विचारले की हा विधी एवढा पवित्र आहे तर मग व जन्मदात्या आईला व आक्काला का नाही? येथूनच स्त्री-पुरुष समानतेची चुणूक त्यांनी दाखवून दिली. महात्मा बसवेश्वरांना मूर्तीपूजा मान्य नव्हती. देवावर श्रद्धा असावी, अंधश्रद्धा नको हा विचार त्यांनी मांडला. दगडाचा नागोबा पाहुणी, दूध वाहा म्हणती, जिवंत नागासी पाहुणी, मारा ठेचा म्हणती, भुकेला जंगम येता चला, पुढे व्हा, म्हणती, न खाणाऱ्या लिंगासी नैवेद्य धरा म्हणती, आमच्या कुडल संघाच्या शरणांना उपेक्षिती, तयांची शिळेखालील ढेकळा परी दुर्गती-दुधाची आहारामध्ये अत्यंत पौष्टिक म्हणून गणना होते. कितीतरी गरीब, अनाथ मुल बाळ किंवा आजारी लोक दुधाविना जीवन जगतात. त्याचवेळी लाखो लिटर दुधाचा अभिषेक नागदेवताच्या मूर्तीवर करतात आणि जिवंत सापाला मात्र मारा ठेचा म्हणतात. एखादा भुकेला व्यक्ती घरासमोर आला की चला पुढे म्हणतात आणि न खाणाऱ्या या दगडाच्या मूर्तीला नैवेद्य दाखवतात. या अनिष्ट प्रथेला त्यांचा प्रखर विरोध होता. विद्यार्जनासाठी कुडलसंगम क्षेत्रिय असताना बसवेश्वरांच्या लक्षात आले की, सर्वच धर्मग्रंथ ब्राह्मणांनी आणि व पुरुषांनीच लिहिले आहेत म्हणूनच धर्म ग्रंथांनी स्त्री जातीवर अन्याय केलेला आहे स्त्री-पुरुष समानतेचा विचार त्यांनी बारावी शतकात मांडला व स्त्री-पुरुषांना समान वागणूक दिली. एक दिवस बसवेश्वराचे मामा बलदेव मंत्री मंगळवेढ्याहून कुडलसंगमला गेले. त्यांनी ईशान्य गुरूंना बसवेश्वर व त्याची कन्या गंगाबिकेच्या विवाहाचा व विवाहनंतर नंतर मंगळवेढा राजधानीतील राजसेवेचा प्रस्ताव सांगितला. गुरुच्या अज्ञानी विवाह संपन्न झाला यानंतर मंत्री बल देवाने बसेश्वर यास कोषागार खात्यात कर्णीक म्हणून नियुक्ती दिली. मकायक वे कैलासफ असल्यामुळे त्याने कायक स्वीकारले. त्यांचा वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा, कार्यनिष्ठा , चिकाटी व बुद्धिमत्ता यामुळे राज्याचे उत्पन्न वरचेवर वाढू लागले. बसवेश्वरांचे निस्वार्थी वर्तन स्वराज्यनिष्ठा या बाबीचा विचार करून बिझल राजाने आपली बहीण क्षत्रिय कन्या निलांबिका हिच्याशी बशेश्वर यांचा दुसरा विवाह केला यावरून बसवेश्वराचे भिन्न जाती बाबत समतेचे व समन्वयाचे उद्धार धोरण लक्षात येते. यावेळी ते मंगळवेढा राज्याचे प्रधानमंत्री होते. ते राज्यातील गोरगरीब, दिनदलित लोकांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेत असे. त्यामुळे सर्वसामान्य व सर्व जातीतल्या लोकांना तेथे आपलेसे वाटू लागले. अस्पृश्यता त्यांना मान्य नव्हती सर्व मानव जात एकच आहे कोणतीही उच निच नसून सर्व समान आहे. सर्व मानव जात एकच कोणीही उच्च नीच नसून सर्व समान आहेत. धर्मांध व जाती जातीत भेदभाव करणाऱ्या उभद्र समाजणाऱ्या लोकांना विरोध करून स्त्री पुरुष समानतेची वर सर्वधर्मसमभावाचे क्रांतीसुर्य बसवेश्वरांने केले. यासाठी त्यांनी आपली कर्मभूमी कल्याण नगरी येथे व म अनुभव मंटप स्थापन केले. यात सर्व जाती धर्मातील स्त्री-पुरुषांना प्रवेश होता. याचे पहिले अध्यक्ष अल्लंप्रभू हे होते. यात आत्माअनुभवाचे देवाण-घेवाण, चर्चा, परिसंवाद व वाद-विवाद करण्यासाठी अनुभव मंटपाची स्थापना केली होती. यात भिन्नभिन्न जाती धर्मांचे सातशे शरण, ७० शरणी, वचन कार म्हणून १ लाख ९६ हजार अनुयायी होते. हरळय्या चांभार, नागदिवी कांबळे, ढोर कक्कया, अरबस्तानातून आलेला शंकर देव, निलांबिका व नागांबिका असे अनेक शरण शरणी होते. या अनुभव मंटपाच्या माध्यमातून त्यांनी बारावी शतकात स्त्री पुरुष समानता, अस्पृश्यता निवारण, सती प्रथा, अंधश्रद्धा निर्मूलन, आंतरजातीय विवाह, विधवा विवाह, स्त्री शिक्षण अशा अनेक गोष्टी घडवून आणत. आजच्या युगात ज्या गोष्टी कायद्याने करावे लागत आहेत त्या गोष्टी १२ व्या शतकात करून समाज परिवर्तन केले. 'कायक वे कैलास ' हे महात्मा बसवेश्वरांचे वचन आजही जगप्रसिद्ध आहे. कायक म्हणजे श्रम, आणि श्रमातूनच पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करता येतो. श्रमशिवाय आपली व सर्व मानवांची उन्नती होऊ शकत नाही. प्रत्येक स्त्रीने व पुरुषांनी आपल्या उपजीविकेसाठी जीवन जगण्यासाठी कोणता तरी व्यवसाय, उद्योग, कामधंदा केलाच पाहिजे. आपले जीवन सन्मानाने, प्रतिष्ठेने जगण्यासाठी श्रम करणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे. ही शिकवण त्यांनी दिली. कार्य कधीही श्रेष्ठ- कनिष्ठ नसते. श्रमाला प्रतिष्ठा असते. व्यक्तीला श्रम करण्याची प्रेरणा महात्मा बसवेश्वरांनी दिलेली आहे. त्यांनी आपल्या बुद्धीचा वापर धर्म सुधारणा, समाज सुधारणा, अर्थ सुधारणा, व राष्ट्रबांधणणीसाठी केला. अनुभव मंटपाच्या माध्यमातून लोकशाहीकरण, स्त्री-पुरुष समानता, व्यवसाय स्वातंत्र्य, श्रम प्रतिष्ठा, कर्तव्यपरायणता, समाजात रुजवण्यासाठी केला. त्यांचे हे विचार आजच्या तरुणांना व समाजाने दीपस्तंभ ठरणार आहेत. त्यांच्या विचाराची गरज आजही आहे. म्हणूनच महात्मा बसवेश्वर समतासूर्य, क्रांतीसूर्य जगतज्योती, युगप्रवर्तक या उपाधीने जगप्रसिद्ध आहेत. अशा या सिद्ध पुरुषास विनम्र अभिवादन.

**अभ्यासक :- सुयश सुभाष हुलपल्ले**
**मुरूम ता. उमरगा जि. धाराशिव**

# समाजातील उत्तम कार्य करणाऱ्यांचा गौरव म्हणजे त्यांच्या कार्याला प्रोत्साहन व चालना आहे.



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** समाजात उत्तम कार्य करून इतरांना दिशा दाखविणे हे महान कार्य आहे. शांतीदूत परिवाराने विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार देवून केलेला गौरव हा प्रेरणादायी असुन येणाऱ्या काळात जोमाने कार्य करता यावे यासाठी बळ देणारा आहे असे मत अमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांनी व्यक्त केले.शांतीदुत परिवाराच्या अध्यक्षा विद्याताई जाधव अध्यक्षस्थानी होत्या.शांतिदूत परिवार महाराष्ट्रच्या वतीने २०२५ साली च्या सेवारत्न पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते सोमवार (ता.२८) रोजी ओम लॉन्स येथे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार प्रवीण स्वामी, शिवसेना उपनेत्यासौ.अस्मिता गायकवाड (सोलापूर), तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार, महाराष्ट्र राज्याचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव उपस्थित होते. आमदार प्रविण स्वामी यांनी समाजाला दिशा देण्यासाठी चांगल्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सौ.अस्मिता गायकवाड यांनी महीला या प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असुन मला शांतीदुतच्या माध्यमातुन समाजात मिसळून कार्य करता येते याचे मला अभिमान असल्याचे मत व्यक्त केले. पोलिस निरीक्षक अश्वीनी भोसले, अमर सुर्यवंशी, अनिल सगर, महमदरफी शेख यांची भाषणे झाली.डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी प्रास्ताविक केले. ॲड. एस.पी.इनामदार यांनी सुत्रसंचलन केले. प्रा.युसुफ मुल्ला यांनी आभार मानले. प्रा. जिवन जाधव, पद्माकर मोरे, मनेश माणिकवार, संतोष जाधव, श्याम पाटील, जितेंद्र घोटाळे, महंमद रफिक शेख, संतोष जाधव, प्रा. अभयकुमार हिरास, मधू चौधरी पुणे, संतोष मोहिते, नसीरुद्दीन शेख यांनी यासाठी पुढाकार घेतला. यावेळी महीला व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० एप्रिल २०२५

# प्रामाणिक व कष्टाळू व्यक्तिमत्व गजभारे सर



माझे गुरुवर्य आदरणीय संजयजी विठ्ठलराव गजभारे आज सेवानिवृत्त होत असताना मनापासून आभाळभर शुभेच्छा माझ्या जीवनामध्ये अगदी सिंहाचा वाटा असणारे गजभारे सर एक प्रामाणिक व्यक्तिमत्व आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी लिहिता वाचता बोलता यावी म्हणून ते सतत प्रयत्नशील असत धडपड करत मी जेव्हा आठवीला होतो तेव्हा आमच्या गावात माननीय भास्करराव पाटील खतगावकर यांनी नवीन शाळा उघडली आणि त्या शाळेचे पहिले शिक्षक म्हणजे गजभारे सर मुख्याध्यापक तेच शिक्षकही तेच त्यांच्या सोबतीला आमच्या गावचे बालाजी गुजरवाड सेवक तर मारुती कल्याणकर लिपिक होते आम्ही आठवीला असताना सर्व विषय गजभारे सरच शिकवायचे सरांचा गाव सुजायतपूर तालुका देगलूर जिल्हा नांदेड येथून ते रोज सायकलवर शाळेला यायचे तब्बल 50 किलोमीटरचा अंतर रोज सायकलवर ये जा करायचे त्यांच्या अंगावरील कपडे पायातील स्लीपर पाहिल्यानंतर त्यांची आर्थिक परिस्थिती बऱ्यापैकी नसावी असे आम्हाला वाटायचे तरीपण विद्यार्थी विषयी त्यांच्या मनात खूप प्रेम वाटायचे मनातून इंग्रजी विषय आम्हाला शिकवायचे तसे ते इंग्रजीचे शिक्षक शाळा नवीन असल्यामुळे पिनरवार सर कपाटे सर कवटकर सर आणि सूर्यवंशी सर यांची नियुक्ती होईपर्यंत सर आम्हाला सर्वच विषय शिकवत त्यांच्या जीवनातील अनेक अनुभव आम्हा विद्यार्थ्यांना शेअर करत परिस्थितीला अनुरूप असे ते जीवन जगत होते त्यावेळी म्हणजे 1991 ला ही शाळा विनाअनुदान तत्त्वावर होती संस्थेचे सचिव आदरणीय बाळासाहेब पाटील खतगावकर साहेब नाममात्र मानधन द्यायचे असे समजले त्याच मानधनावर सर्व शिक्षक ज्ञानार्जनाचं कार्य करायचे त्यातल्या त्यात गजभारे सर म्हणजे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व सर माझे आवडते शिक्षक होते सर मला नेहमी म्हणायचे बालाजी बेटा तू अभ्यास भरपूर कर तू एक मोठा माणूस होशील त्यांच्या सांगण्यानुसार मी घडत गेलो इंग्रजीचे लेखन कसे करावे मराठी कशी लिहावी शुद्धलेखन कसे लिहावे याचे धडे आम्हाला रोज द्यायचे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व असणारा शिक्षक आमच्यासाठी प्रेरणादायी होता आणि जीवनाचा मार्गक्रम करत असताना नेहमी मी माझे मित्र इंग्रजी विषयांमध्ये थोडेफार आम्ही खेड्यातील असल्यामुळे आम्हाला तेवढी इंग्रजी जमत नव्हती पण दहावीचे परीक्षा केव्हा आली तेव्हा मात्र इंग्रजीचा आम्हीच झपाटून अभ्यास केला आणि मला इंग्रजी मध्ये फर्स्ट क्लास मार्क नव्हे तर सर्वप्रथम येण्याचा मान सुद्धा मिळाला आहे हे केवळ जिगर गजभारे सर यांच्यामुळेच ही जिद्द ही चिकाटी माझ्यामध्ये निर्माण झाली होती ते श्री संगमेश्वर विद्यालय बडुर हे एखाद्या छोट्याशा घरामध्ये सुरू होऊन ते वटवृक्ष सारखं एक खूप मोठी इमारत झाली आणि त्यांच्यामध्ये असणारे शिक्षक हे सुद्धा विद्वान गुरुजन वर्ग होते पण त्यापैकी एक माझे आवडते शिक्षक म्हणून मी पहिल्या बॅचचा विद्यार्थी मला प्राध्यापक होण्याचा मान मी केवळ गजभारे सरांमुळेच मिळाला कारण आम्ही जेव्हा सरच्या रूमवर अभ्यास करायला जायचो तेव्हा सर नेहमी म्हणायचे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी चा पीएचडी चा सिल्याबस ज्या सिल्याबसला सात वर्ष लागतात असा सिल्याबस निर्माण करण्याच्या विद्वानांचा दावा होता ते केवळ दोन वर्षात पूर्ण करून केले सर्वविद्वान यांना सिल्याबस निर्माण करणाऱ्यांना आश्चर्याचा धक्काच दिला असं ते आम्हाला सांग आणि अभ्यास करण्यास प्रेरणा देत एक संघर्ष करण्याची ताकद सरांमुळेच मिळाली ते संघर्ष करतच मी एका नामवंत कॉलेजमध्ये म्हणजेच लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या धर्माबाद येथे राज्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो केवळ हे घडण्यामध्ये संजयजी गजभारे सर पिंनरवार सर मठपती सर कवटकर सर कपाटे सर यांच्यामुळे शक्य झाले गजभारे सरांच्या मधुर वाणीतून त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना भविष्यात स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर इंग्रजी विषयाचा अभ्यास जास्त करा असे सांगायचे माझे मित्र संतोष पांचाळ मारुती तारे मी डॉ बालाजी श्रीगिरे हे केवळ संजय जी गजभारे सर यांच्यामुळेच म्हणून मला त्यांचा सार्थ अभिमान आहे सर सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या जीवनात जी स्वप्न अपुरी राहिलेली आहेत ते पूर्ण होऊ अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देतो.

**आपलाच माझी विद्यार्थी -डॉ बालाजी श्रीगीरे (राज्यशास्त्र विभाग) लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद**

## गुगल टेक कार्यक्रमात साहिल इनामदार यांच्या स्टँडअप सादरीकरणाला भरभरून प्रतिसाद




**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशनच्या विद्यार्थी विभागातील 'वुमन टेकमेकर्स' या उपक्रमांतर्गत आयोजित गुगल टेक कार्यक्रमात stand-up comedian साहिल इनामदार यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.महात्मा गांधी मिशनच्या रुक्मिणी सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अजीज कादरी, उद्योजक दिलीपेश मानकापे, सामाजिक कार्यकर्त्या निर्मला पद्मावत आणि अर्पिता शरद यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या अनुभवातून उपस्थितांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात साहिल इनामदार यांनी सादर केलेल्या विनोदातून समाजात चाललेल्या घटनांवर भाष्य करत स्वच्छ, सुसंस्कृत आणि विचारप्रवृत्त हास्यनिर्मिती केली. सध्याच्या अश्लीलतेने भरलेल्या विनोदी प्रवाहात वेगळेपण जपत त्यांनी सादर केलेल्या शैलीला उपस्थितांनी भरभरून दाद दिली.कार्यक्रमाचे आयोजन वुमन टेकमेकर्स - एमजीएम कॉलेजच्या वतीने करण्यात आले होते, ज्यात तंत्रज्ञान, मानसिक आरोग्य आणि सर्जनशीलता यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

## अल्पवयीन मुलीचे बलात्काराची धमकी देत केले अपहरण



**वाळूज :** दोन मुलांसह एका किराणा दुकानदाराचे ७ जणांनी अपहरणाचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर दिलेले पैसे करत कर नाही तर मुलीवर बलात्कार करतो अशी धमकी देत अपहरण केले. मात्र पोलिसांनी हा कट उधळून लावला. हा प्रकार रविवारी एमआयडीसी वाळूज परिसरात घडला. प्रकरणी पोलिसांनी सात जणांवर गुन्हा दाखल करून ५ जणांना अटक केली आहे, तर दोन महिलांना नोटीस देत सोडले आहे.

३८ वर्षांच्या व्यक्तीने दिलेल्या तक्रारीनुसार त्यांनी आरोपी वैभव बिहारीलाल जैस्वाल, प्रशांत विलास डांगे या खासगी सावकारांकडून १० लाख रुपये व्यवसायासाठी घेतले होते. परंतु उसने घेतलेले पैसे ते परत देत नसल्याने आरोपी वैभव जैस्वाल, प्रशांत डांगे, गणेश डगळे, ओमकार पोपळघट, कुणाल पोपळघट, परीघाबाई डांगे, जयश्री जैस्वाल यांनी फिर्यादीच्या घरात घुसत मारहाण केली.

आरोपींनी फिर्यादीच्या मुलीवर बलात्कार करण्याची धमकी देत फिर्यादीची १५ वर्षांची मुलगी आणि १३ वर्षांच्या मुलासह जबरदस्तीने कारमध्ये टाकले. मात्र १७ वर्षांची मुलगी त्यांच्या तावडीतून सुटली. ती जवळच्या मंदिरात लपली. आरोपींनी गाडीत धमक्या दिल्या. त्यानंतर बांधकाम साइटवर नेत बेदम मारहाण केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० एप्रिल २०२५


## बालरंगभूमी परिषदेच्या नृत्य नाट्य शिबिरात बालकांचे नृत्य अभिनय रंग फुलले.




**छत्रपती संभाजीनगर :** बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) जिल्हा शाखेतर्फे विविध कार्यक्रमांचे, उपक्रमांचे आयोजन शहरातील व जिल्ह्यातील विविध ठिकाणी करण्यात येणार आहे. बालरंगभूमी परिषदेतर्फे पहिला उपक्रम मराठवाडा कामगार ग्रंथालय, गुलमोहर कॉलनी, एन- ५, सिडको, छत्रपती संभाजीनगर याठिकाणी बालनाट्य व नृत्य प्रशिक्षण शिबिर दिनांक २४ ते २७ एप्रिल २०२५ वेळ सकाळी ८:०० ते १०:०० वेळेत संपन्न झाले या शिबिरात प्रशिक्षक अभिजीत भातलौंढे , अर्चना देवधर व वैजनाथ राठोड यांनी रंगमंचाची ओळख करून देत अभिवाचन, नाट्यछटा, बालनाट्याची ओळख, बालनाट्यातील अभिनय नृत्य याचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन करीत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाशी संबंधित असलेल्या घटकांवर भर दिला. शिबिरात एकूण 20 बालकांनी सहभाग घेतला. शिबिरात सहभागी सर्व बालकांना बालनाटकांची व गोष्टींची पुस्तके वाटप करण्यात आली. शिबिर समारोप प्रसंगी बालरंगभूमी परिषदेचे शाखेचे उपाध्यक्ष वाल्मीक जाधव प्राचार्य डॉ. हसन इनामदार, प्रमुख कार्यवाह गोकुळ गायकवाड, , कोषाध्यक्ष विनोद आघाव, कार्यकारणी सदस्य रमेश सोळंके, लक्ष्मण अहिरे, श्रीपाद पदे, असलम शेख यांच्या सह सभासद विशाखा शिरवाडकर , प्रदीप कांबळे आणि पालकांची उपस्थिती होती यावेळी बालकांनी अभिनय सादरीकरण सोबत नृत्य सादरीकरण ही केले. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. सदरील शिबिर हे निःशुल्क घेण्यात आले.

## लेकीचे कन्यादान केले अन् अचानक हृदयविकाराचा झटका आला



**भंडारा :** भंडारा जिल्ह्यात एक अतिशय दुर्देवी घटना घडली आहे. मुलीच्या डोक्यावर अक्षता टाकताच लग्न मंडपातच वडिलांचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. तुमसर तालुक्यातील झारली गावात दुपारी ३ च्या सुमारास ही घटना घडली. लग्न लागत असतानाच वडिलांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण गाव हळहळले आहे. गणेश खरवडे (५४) असे मृत वडिलांचे नाव आहे.

मुलीच्या लग्नातच वडिलांचा मृत्यू झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत वडील गणेश वरखडे हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांच्याकडे एक एकर शेती आहे. आपल्या लेकीच्या लग्नासाठी कष्टाने पैसा उभा करत थाटात लग्न लावले. दुपारी मुलीचे कन्यादान झाले व पाहुण्यांची वर्दळ सुरू झाली. त्यावेळी स्टेजवरच वधूच्या वडिलांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि तिथेच ते कोसळले व तिथेच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर मोठे दुःख कोसळले आहे. तसेच वडिलांच्या अचानक निधनामुळे वधूची पाठवणी देखील थांबवण्यात आली आहे.

दरम्यान, यवतमाळ येथे देखील अशीच घटना घडली होती. यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील वागद इजारा येथे एक दुर्देवी घटना घडली आहे. मुलगी आयएएस अधिकारी झाल्याचा आनंद साजरा करत असतानाच वडिलांना हृदयविकाराचा तीव्र झटका आणि यातच त्यांचे निधन झाले. प्रल्हाद खंदारे असे मृत्युमुखी पडलेल्या वडिलांचे नाव आहे. पुसद पंचायत समितीचे ते सेवानिवृत्त विस्तार अधिकारी होते.

प्रल्हाद खंदारे यांची मुलगी मोहिनी यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत आयएएस अधिकारी पदावर निवड झाली. या क्षणाचा आनंद साजरा करण्यासाठी गावात मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मात्र, या कार्यक्रमातच प्रल्हाद खंदारे यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने महागाव येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. खंदारे कुटुंबावर यामुळे शोककळा पसरली आहे. आनंदाचा क्षण क्षणात दुःखात बदलून गेला.

## हिंदू-मुस्लीम ऐक्य जोपासणे हीच भारताची अस्सल परंपरा - प्रा. जयदेव डोळे




**छत्रपती संभाजीनगर :** सृजन सांस्कृतिक मंच आणि महात्मा गांधी स्मारक निधी, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ एप्रिल २०२५ रोजी, महात्मा गांधी भवन,समर्थ नगर या ठिकाणी ईदमिलन व मिनाज लाटकर संपादित ईदोत्सव विशेषांक 'नब्ज' या विशेषांकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम 'नब्ज-ए-पहल' घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गोरडे सर हे होते, तर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रा. जयदेव डोळे सर, डॉ. मजिद शेख सर आणि नब्ज अंकाचे सहसंपादक कौस्तुभ पटाईत हे होते. 'भारताच्या इतिहासात उजव्या शक्तींनी एक कुटील डाव असून सबंध भारताची हिंदू-मुस्लिम ऐक्याची जी परंपरा होती, त्या परंपरेला मोडीत काढण्यासाठी जनमानसात मुस्लिम समुदायाबद्दल एक प्रकारचा नकारात्मक प्रतिकांचा वापर करून भारतीयांच्या मनात द्वेष पसरवण्याचे काम केलेले आहे.आज देखील ते याच प्रकारचा प्रचार करून हिंदू-मुस्लिम भाईचा-याला तोडण्याचे काम करत आहेत. सर्वसामान्य जनतेत मुस्लिम समुदायाबद्दल कायम आपुलकी आणि प्रेमाचे संबंध आढळतात कारण हा सर्व कष्टकरी समाज आहे. परंतु जाणीवपूर्वक स्वतःच्या सत्तास्थानाला शाबूत ठेवण्यासाठी हिंदू-मुस्लिम वाद निर्माण केला जात आहे आणि समाज मनात एक प्रकारची दुही पसरवली जात आहे. पण भारतीय जनता या द्वेषाच्या प्रचाराला कधीही बळी पडणार नाही, असे प्रतिपादन प्रा. जयदेव डोळे सर यांनी आपल्या भाषणात केले. 'नब्ज'चे सहसंपादक कौस्तुभ पटाईत यांनी हा विशेष अंक काढण्यासाठीची भूमिका विस्तृतपणे मांडली. त्याचबरोबर त्यांनी नुकताच काश्मीर मधील पहलगाम या ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जे जखमी झालेले आहेत त्यांची कशा प्रकारे सद्भावना दाखवत येथील मुस्लिम समुदायाने तत्परतेने मदत केली याबद्दल मांडणी केली. त्याचबरोबर अशा प्रकारची सौहार्यता ही या देशाच्या जमिनीत मुरलेली आहे आणि ती आपल्या देशाच्या प्रत्येक भागात पाहायला मिळते. ही खऱ्या अर्थी आपल्या देशाची संस्कृती आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले. डॉ. मजीद सर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आधुनिक काळात जर आपल्याला तगून राहायचे असेल तर आपल्याला वैज्ञानिक दृष्टिकोनासह, बहुभाषिकतेला अंगीकारावे लागणार आहे. त्याचबरोबर धर्म ही केवळ ज्याची त्याची वैयक्तिक श्रद्धा असलेला विषय आहे. धर्म हा कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक जीवन व्यवहारात उतरता कामा नये, अन्यथा आपल्या संविधानातील तत्त्वाचे उल्लंघन होईल, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. मच्छिन्द्र गोरडे सर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मांडले की, सत्य हे वारंवार ठासून सांगणे सध्याच्या काळात क्रमप्राप्त झालेले आहे. कारण असत्य हे संपूर्ण शहरभर पसरलेले आहे. म्हणून आपण सत्याचा प्रसार करत राहणे हे आपल्या सर्वांचे आद्यकर्तव्य आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सृजन सांस्कृतिक मंचच्या सुनीता लोंढे यांनी केले त्यात त्यांनी सृजन सांस्कृतिक मंच समाजामध्ये ऐक्य टिकावे यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मदतीने सातत्याने प्रयत्न करत असते, अशी भूमिका मांडली. कार्यक्रमात सहभागी महिलांनी माणुसकी हाच धर्म आहे आणि कोणताही धर्म द्वेष करण्याचं शिक्षण देत नाही उलट प्रत्येक धर्म प्रेमाचं संदेश देतो असं मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फातिमा मॅडम यांनी आपल्या अस्खलित उर्दू शैलीत केले. तसेच कार्यक्रमाचे आभार पत्रकार हनुमान लव्हाळे यांनी मांडले आणि कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गजेंद्र प्रधान, अरुण मते, सत्यजित म्हस्के, प्रतीक बोर्डे, रमेश जोशी, दादासाहेब शिंदे, योगेश खोसरे आशिष जाधव, आयटी कॉर्नरचे रज्जाक शेख,रवी मोताळे, शाहीस्ता मॅडम, उषा खंडागळे मॅडम, सुलताना मॅडम आदींनी परिश्रम घेतले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002